# आयसीडब्ल्यूए मार्गदर्शन वर्गाचे उद्घाटन

औरंगाबाद, ता. १५ : दि इन्स्टिट्यूशन ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंट्स ऑफ इंडियाच्या मार्गदर्शन वर्गाचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ महाराष्ट्रचे सहायक महाव्यवस्थापक प्रभाकर देशमुख आणि गरवारे उद्योगसमूहाचे वरिष्ठ महाव्यवस्थापक ए. के. अग्रवाल उपस्थित होते.

सौरभ मंगल कार्यालयात शनिवारी (ता. सात) झालेल्या कार्यक्रमात चॅप्टरचे अध्यक्ष आर. पी. गोरे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर उपाध्यक्ष राजेश शुक्ला यांनी परिचय करून दिला. श्री. गोरे यांनी चॅप्टरतर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. प्रशिक्षण समितीचे अध्यक्ष ए. आर. जोशी यांनी या अभ्यासक्रमानंतरच्या विविध संधींबद्दल माहिती दिली.

वाढती स्पर्धा आणि जागतिकीकरणामुळे कॉस्ट अकौंटंट्सचे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे,'' असे प्रतिपादन श्री. देशमुख यांनी केले, तर 'भविष्याची दृष्टी असलेला अकौंटंट म्हणजे कॉस्ट अकौंटंट,' असे मत श्री. अग्रवाल यांनी व्यक्त केले. राजेंद्र झंवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शीतल कदम, सुनील मणियार आणि केदार कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सुरेश पिंपळे यांनी सूत्रसंचालन केले, तर राजेश शुक्ला यांनी आभार मानले.कार्यक्रमाला एम. आर. पंडित, एस. बी. खडके, आर. पी. मोदानी, आर. जी. झंवर, एस.. पी. बंगाळे, सचिन राठी, आर. बी. मुळी, राहुल लोहाडे, मिलिंद देशपांडे, अनिल कुलकर्णी, तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी शिरीष जोशी, रवीकिरण पाटील यांनी प्रयत्न केले.



दि इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकौंटंट्स ऑफ इंडियाच्या मार्गदर्शन वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी प्रभाकर देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या वेळी एस. आर. पिंपळे, राजेश शुक्ला, ए. के. अग्रवाल, आर. पी. गोरे आणि ए. आर. जोशी.

दैनिक प्रकाश